साईमत

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले...

# राज्य शासन नेहमीच महिला भगिनींच्या पाठिशी



संपूर्ण देशात सुरू असलेला विकासाचा रथ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या रुपाने जळगाव जिल्ह्यात आला आहे. केळी, कांदा उत्पादन साठी जळगाव जिल्हा प्रसिद्ध असून शेतकऱ्यांच्या पाठीशी राहणारे हे सरकार असल्याचे जाहीर केले.प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी तीन कोटी महिलांना लखपती दीदी बनविण्याचा संकल्प केला आहे. राज्यात 50 लाख लखपती दीदी बनविण्यात येणार आहे,त्यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. राज्य शासनाचे प्राधान्य नेहमीच महिलांना सजग, सक्षम आणि सुरक्षित बनविण्याचे राहिले आहे. राज्य शासन नेहमीच महिलांच्या पाठिशी राहील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

दैनिक

साईमत

दि. २६ ऑगस्ट, २०२४

# प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी 'लखपती दीदींशी' साधला संवाद

## आर्थिक सक्षमतेबरोबर आत्मसन्मान मिळाल्याची लखपती दीदींची भावना

जळगाव । न.प्र.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जळगाव येथे देशातील निवडक लखपती दीदिंशी शी संवाद साधला. लखपती दीदी योजनेमुळे त्यांच्या जीवनमानात झालेल्या बदलाविषयी त्यांनी संवादाच्या माध्यमातून जाणून घेतले. "लखपती दीदी योजनेमुळे महिला बचतगटांना मिळालेल्या आर्थिक, व्यावसायिक सहाय्य व प्रशिक्षणामुळे आम्ही आर्थिकदृष्ट्या सक्षम झालो. त्याचबरोबर आम्हाला आत्मसन्मान ही मिळाला."अशी भावना लखपती दीदींनी यावेळी व्यक्त केली.

येथील प्राइम इंडस्ट्रियल पार्क मैदानावर झालेल्या लखपती दिदी संमेलनापूर्वी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी



देशातील निवडक अशा ८० लखपती दीदींशी संवाद साधला. या लखपती दिदी संवाद कार्यक्रमात देशातील वेगवेगळ्या राज्यांतील बँक सखी दिदी, ड्रोन दीदी, पशु दिदी, कृषी दिदी म्हणून नावारूपाला येऊन लखपती झालेल्या महिला उपस्थित होत्या.

यावेळी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, राज्याचे ग्रामविकास, पंचायत राज व पर्यटन मंत्री गिरीष महाजन आदी मान्यवर उपस्थित होते.

# जळगाव विमानतळावर स्वागत

जळगाव । न.प्र.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे लखपती दिदी मेळाव्यासाठी आज जळगाव विमानतळावर आगमन झाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वागत प्रसंगी राज्याचे मदत, पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन मंत्री अनिल पाटील, मुख्य सचिव सुजाता सौनिक, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, पोलीस अधीक्षक एमसीव्ही महेश्वर रेड्डी आदी उपस्थित होते.

विमानतळ स्वागतानंतर त्यांनी तेथे उपस्थित लखपती दिदींशी संवाद साधला. त्यानंतर





त्यांचे लखपती दिदी संमेलन स्थळी आगमन झाले. प्रधानमंत्र्यांच्या आगमनापूर्वी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे जळगाव विमानतळावर आगमन झाले. त्यांचे स्वागत नाशिक विभागीय आयुक्त प्रविण गेडाम यांनी केले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. याप्रसंगी त्यांच्या समवेत असलेले उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचेही स्वागत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले.

दैनिक

साईमत

दि. २६ ऑगस्ट, २०२४

# साईमत

# जलजीवन मिशनमुळे पाणीपुरवठा विभागाला झळाळी : मंत्री गुलाबराव पाटील

## म.जी.प्रा.च्या इतिहासातील सर्वात मोठी भरती

पाळधी,ता.धरणगाव ।प्रतिनिधी ।

**अडीच वर्षात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाद्वारे जनतेसाठी व कर्मचाऱ्यांसाठी अनेक हिताचे निर्णय घेतले आहे. अनुकंपाधारक कर्मचारी यांना सुमारे ४५० कर्मचाऱ्यांना नोकरीत समावेश केले आहे. पाणी पाजणे हे पुण्य कर्म आहे. त्यासाठी प्रत्येक अनुकंपाधारक कर्मचाऱ्यांनी सतत प्रयत्नशील रहावे. जलजीवन मिशनमुळे पाणीपुरवठा विभागाला झळाळी आली असल्याचे प्रतिपादन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. पाळधी येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अनुकंपा कृती समितीच्यावतीने जाहीर सत्कार, कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन केले होते. त्याप्रसंगी ते बोलत होते. सुरुवातीला नेपाळमध्ये जळगाव जिल्ह्यातील वरणगाव, तळवेल व भुसावळ परिसरातील अपघातात मृत झालेल्या भाविकांना श्रद्धांजली वाहण्यात आली.**



म.जी.प्रा.च्या इतिहासात अनुकंपा भरती प्रक्रिया पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या कार्यकाळात पूर्णत्वास आली. गेली २० वर्ष विविध आंदोलने,' धरणे तसेच उपोषणाच्या माध्यमातून अनुकंपाधारक न्यायाच्या प्रतिक्षेत होता. अखेर मंत्री गुलाबराव पाटील यांच्या कार्यकाळात आतापर्यंत ४५० अनुकंपाधारकांना नोकरी मिळाल्याने कुटुंबियांचे पुनर्वसन त्यांनी केले. त्याबद्दल राज्यातील विविध जिल्ह्यातून आलेल्या अनुकंपाधारकांनी त्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त केली.

ते पुढे म्हणाले की, केंद्र व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने 'हर घर जल, 'हर घर नल' या जल जीवन मिशन योजनेची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू असून राज्यातील जनतेपर्यंत पाणी पोहोचवीत असल्याचे आत्मिक समाधान मिळत असल्याने मला माझ्या खात्याचा अभिमान वाटतो. आतापर्यंत ४५० अनुकंपधारकांना नोकरी मिळाल्याने या कुटुंबियांचे प्रकारे पुनर्वसन झाले असून याशिवाय प्रत्यक्ष यादीतील उर्वरीत सुमारे १५० अनुकंपाधारकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनास निर्देश दिलेले आहे. त्या अनुषंगाने कार्यवाही सुरू असल्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. प्रास्ताविकात मुंबईचे सतीश सांगळे यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी देवदूताप्रमाणे आम्हाला कसा न्याय मिळवून दिला. त्याबद्दल सविस्तर माहिती विषद केली. सूत्रसंचालन ठाण्याचे रुपेश वंदरकर तर आभार अमरावतीचे किशोर लाहे यांनी मानले.

### यांची होती उपस्थिती

याप्रसंगी माजी सभापती मुकुंदराव नन्नवरे, सचिन पवार, ज्येष्ठ पत्रकार दीपक झंवर, मुन्ना झंवर, राज्यातील विविध भागातून आलेले कार्यरत कर्मचारी सतिश सांगळे, अविनाश गडगे, सुनील भेरे, विजय माळी, काशिफ कुरेशी, किशोर लाहे, अमोल बोरकर, पुष्पराजे पुरे, संदीप कोरडे, मंजुनाथ गवळी, श्री मोडिकर, भक्तराम फड, संतोष नागरे, प्रविण तेजारे, अमित जाधव, शाहीद मुल्ला, अजय यादव, महेश पाटील, सागर पाटील, युनुस शेख, श्रीमती यामिनी जोशी, स्वप्नील कुलकर्णी, निलेश कांडेकर, प्रशांत जोगी, नितेश भागवत आदींची उपस्थिती होती.

साईमत

# मुख्यमंत्री म्हणाले....
# प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे स्वप्न पूर्ण करणार

जळगाव । विशेष प्रतिनिधी

राज्यात महिलांच्या सक्षमीकरणासाठी आपण मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत 1 कोटी महिलांच्या खात्यात दोन हप्ते जमा करण्यात आले. अन्नपूर्णा योजने अंतर्गत तीन गॅस सिलिंडर देण्याची योजना सुरु केली. मुलींना उच्च शिक्षण मोफत, महिलांना प्रवासात सवलत या माध्यमातून महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचे काम राज्य शासन करत आहे. मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानातून प्रधानमंत्री महोदयांचे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प आपण केला असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नमूद केले.



**नेपाळ दुर्घटनेतील वारसांना प्रत्येकी 5 लाख**

नेपाल येथे झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना राज्य शासनाच्या वतीने पाच लाख रुपयांची मदत केली जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

देशाच्या ३ कोटी लखपती दीदी बनवण्याच्या प्रक्रियेत महाराष्ट्राचा वाटा मोठा असेल. देशातील तीन कोटी दीदी मध्ये राज्यातील 50 लाख दीदींचा समावेश राहील. अनेक भगिनी पुढाकार घेऊन छोटे छोटे उद्योग करून कुटूंबाला पुढे नेत आहेत. राज्यात २५ हजार स्वयंसहायता गटांना ३० कोटींची कर्जे देण्यात आली आहे. त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जात असल्याचे श्री. शिंदे यांनी सांगितले.

देशाला महाशक्ती बनवण्यासाठी महिलांची भागीदारी आवश्यक आहे. त्यासाठी केंद्र शासनाचे सहकार्य मिळत आहे. केंद्र शासनाने 76 हजार कोटींच्या वाढवण बंदर विकासाला सहाय्य केले. मेट्रो प्रकल्पाला मदत केली. राज्यातील कांदा, कापूस, दूध, सोयाबीन यांना चांगला दर मिळण्याच्या दृष्टीने आणि सिंचन प्रकल्पांना निश्चितपणे मदत करेल, असा विश्वासही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केला.

दैनिक

# साईमत

# दि. २६ ऑगस्ट, २०२४

# महिला सुरक्षिततेसाठी कटीबद्ध ; सक्षमीकरणातून देशाला विकसित करणार

## प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची दिली ग्वाही; 'लखपती दीदी' संमेलनाला मिळाला उदंड प्रतिसाद

विशेष प्रतिनिधी । जळगाव

भारताची वाटचाल जगातील तिसऱ्या क्रमांकाचा विकसित देश म्हणून सुरु असून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणातून सर्वांगीण प्रगती साधत विकसीत भारताचे ध्येय गाठू,असा विश्वास व्यक्त करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटनांबाबत कठोर कारवाई केली जाईल.या प्रकरणी दोषींना कडक शासन व्हावे, यासाठी भारतीय न्याय संहिते अंतर्गत कायद्याचा वापर केला जाईल. महिलांवर अन्याय आणि अत्याचार करणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत सोडले जाणार नाही. महिलांचे सामर्थ्य वाढविण्याबरोबरच त्यांची सुरक्षितता महत्वाची आहे. यासाठी आवश्यक ती मदतही प्रत्येक राज्यांना केली जाईल, महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी केंद्र सरकार राज्य सरकारांसोबत राहील,अशी ग्वाही पंतप्रधान यांनी दीली.



जळगाव येथील विमानतळ परिसराजवळच असलेल्या प्राईम इंडस्ट्रीअल पार्क येथे देश पातळीवरील लखपती दीदी संमेलनाचे आज रविवार,25 ऑगस्ट रोजी आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी प्रधानमंत्री श्री.मोदी बोलत होते.यावेळी कार्यक्रमाच्या व्यासपीठावर राज्यपाल डॉ. सी.पी. राधाकृष्णन,मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय ग्रामीण विकास राज्यमंत्री डॉ. चंद्रशेखर पेम्मासानी, केंद्रीय राज्यमंत्री कमलेश पासवान, केंद्रीय राज्यमंत्री रक्षाताई खडसे, ग्रामविकास मंत्री गिरीशभाऊ महाजन, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री अनिलदादा पाटील,खासदार स्मिताताई वाघ, आमदार सर्वश्री संजयभाऊ सावकारे,राजुमामा भोळे, किशोरआप्पा पाटील,मंगेशदादा चव्हाण,आमदार लताताई सोनवणे यांच्यासह मान्यवरांची यावेळी व्यासपीठावर उपस्थिती होती.

### नेपाळ दुर्घटनेतील भाविकांना आदरांजली

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मनोगतला सुरुवात करतांनाच नेपाळमध्ये शुक्रवारी,23 ऑगस्ट रोजी झालेल्या अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या यात्रेकरूंबाबत संवेदना व्यक्त करून या घटनेनंतर केंद्र आणि राज्य शासनाने तातडीने पावले उचलली. केंद्रीय राज्यमंत्री श्रीमती रक्षाताई खडसे यांना तातडीने नेपाळला पाठविले. या दुर्घटनेत जखमी असलेल्यांवर चांगले उपचार सुरू असल्याचे नमूद करून मृतांच्या कुटूंबियांना केंद्र आणि राज्य सरकारच्या वतीने मदत देण्यात येईल, असे स्पष्ट केले.

(पान ५ वर)

### देशाच्या विकासात नारीशक्तीचे मोठे योगदान : फडणवीस



महिला विकासाच्या प्रवाहात आल्यास देशात प्रभावी आणि विकासात्मक बदल घडू शकतो. त्यामुळेच विकासाच्या प्रक्रियेत महत्वाचे स्थान असणाऱ्या नारीशक्तीच्या आर्थिक बळकटीकरणासाठी राज्य शासन सर्वोतोपरी साहाय्य करत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. आज नारीशक्ति विविध क्षेत्रात आपले नाव कमावत आहे. देशाच्या या विकासाच्या भागीदारीत महाराष्ट्र कुठेच कमी पडणार नाही. संत मुक्ताई आणि कवयित्री बहिणाबाई यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी आहे. अशा ठिकाणी हे लखपती दीदींचे संमेलन होत आहे. राज्यात बचतगटामार्फत 75 लाख कुटूंब जोडली गेली असून दोन कोटी कुटूंब जोडण्याचा संकल्प आपण केला आहे. जळगाव जिल्हा सुजलाम सुफलाम करण्यासाठी महत्वाच्या असणाऱ्या नार-पार सिंचन योजनेला आपण गती दिली. मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर निविदा आणि इतर प्रक्रिया सुरु होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

### कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी यांचे श्रेय



संपूर्ण देशाला संबोधित करणाऱ्या लखपती दीदींच्या जळगावात पार पडलेल्या या संमेलनाच्या आयोजनामागे राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीषभाऊ महाजन यांच्यासह राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, ग्रामविकास विभागाचे सचिव एकनाथ डवले, नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद व बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता प्रशांत सोनवणे यांनी गेल्या पंधरा - वीस दिवसांपासून प्रचंड मेहनत घेतल्याने विक्रमी संख्येच्या मोठ्या महिलांच्या उपस्थितीचा हा कार्यक्रम अभूतपूर्व उत्साहात आणि यशस्वी पार पडला.

*नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः।*
*न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ॥*

( श्रीमद् भगवद्गीता ॥ 2.23 ॥ )